**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १६५/२०११-१२ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. दिलीप बाबुराव भोसले,<br>मु.पो. जत, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. दिलीप बाबुराव भोसले, मु.पो. जत, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग विरुध्द तक्रार दि. १५.२.२०१२ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार ग्राहकाने आपली शेत जमीन गट क्र. ६८७/१ येथे नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी चलन रु. ५०५०/- दि. २४.८.२०११ रोजी पावती क्र. ८७६०२९९ नुसार भरले आहे. चाचणी अहवाल त्याचदिवशी दिला आहे. वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने दि. २३.११.२०११ पर्यंत विद्युत पुरवठा मिळणे आवश्यक होते, तो आजतागायत मिळाला नाही. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दि. ५.१२.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने कुठलेही आदेश केले नाहीत. मंचाकडून अपेक्षित मदत - परवानेधारकाला एका निश्चित कालावधीत कृती मानके पूर्ण करण्याचे मंच आदेश देऊ शकते. त्यामुळे एका निश्चित कालावधीत वीज जोडणी देणे बाबत आदेश वि.प.स द्यावेत.

वितरण कंपनीने आपल्या दि. १०.४.२०१२ च्या लेखी अहवालात ग्राहकाने शेतीपंप वीज जोडणीसाठी दि. २४.८.२०११ ला चलन भरुन त्याचदिवशी चाचणी अहवाल दिलेला आहे. परंतु चाचणी अहवालाप्रमाणे जागेची तपासणी केली असता जागेवर मोटारपेटी व मोटर नाही असे आढळले. तसेच ज्या ग्राहकांनी दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेले आहेत अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. दि. ३१.३.२०११ च्या अगोदर चलन भरलेले एकूण ६७ लोकांचे लाईन ओढून कनेक्शन देणे बाकी आहे. तसेच दि. ३१.३.२०११ नंतर चलन भरुन प्रलंबित यादी एकूण ४३४ ची आहे, त्यामध्ये श्री. भोसले यांचे जेष्ठता यादीमध्ये नांव २१८ क्रमांकावर आहे. त्यामुळे अगोदरच्या अर्जदारांचे काम झाल्यानंतर श्री. भोसले यांचे काम हाती घेवून तीन पोलची लाईन ओढून त्यांचे कनेक्शन देण्यात येईल असे नमूद केले आहे. ग्राहकाची भरपाईची मागणी मान्य करण्यात येवू नये, कारण कृती मानके विनियम २००५ कलम १२.२ नुसार कृती मानकांमधील कमतरता दूर करण्यात आली नसल्यामुळे भरपाईचा कालावधी निश्चित होत नाही असे म्हटले आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. १२.४.२०१२ ला घेण्यात आली. त्यावेळी ग्राहक गैरहजर, प्रतिनिधी नेमला नाही. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, कनिष्ठ अभियंता श्री. कुलकर्णी उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. ३१.३.२०१२ पर्यंत जेष्ठतायादी प्रमाणे कनेक्शनचे काम चालू आहे. प्रलंबित यादी एकूण ४३४ ची आहे, त्यामध्ये श्री. भोसले यांचे जेष्ठता यादीमध्ये नांव २१८ क्रमांकावर आहे. त्यामुळे जेष्ठतायादीनुसार २१७ अर्जदारांचे कनेक्शनचे काम झाल्यानंतर त्यांना वीज जोडणी देण्यात येईल असा बचाव घेतला.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाची वीज जोडणी एका निश्चित कालावधीत व्हावी ही मागणी मंजूर करणे योग्य आहे काय ?

उत्तर : होय

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

## कारणमिमांसा

उभयबाजूंच्या कथनानुसार ग्राहकाने शेतीपंप वीज जोडणीसाठी दि. २४.८.२०११ रोजी चलन चलन भरुन त्याचदिवशी चाचणी अहवाल दिलेला आहे. वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने दि. २३.११.२०११ पर्यंत विद्युत पुरवठा मिळणे आवश्यक होते. उलट वि.प.ने आपल्या लेखी अहवालात ज्या ग्राहकांनी दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेले आहेत, अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत असे म्हटले आहे. वि.प.ने लेखी अहवालात उपस्थित केलेला मुद्दा जागेची तपासणी केली असता जागेवर मोटारपेटी व मोटर नाही असे आढळले, या पुष्ट्यर्थ कुठलाही कागदोपत्री पुरावा हजर केला नाही किंवा तपासणी करण्याबाबतची नोटीस ग्राहकास दिल्याचे कथन केले नाही किंवा त्याचा पुरावा हजर केला नाही. विद्युत कायदा २००३ कलम ४३ व कृती मानके तरतुदीनुसार परवानेधारकावर अर्जदार ग्राहकाने वीज पुरवठा मागणी केल्यानंतर त्यांना वीज पुरवठा देणे बंधनकारक आहे. अर्जदार ग्राहकाने दि. २४.८.२०११ ला वीज पुरवठा मागणी अर्ज करुन चाचणी अहवाल दिल्यानंतर कृती मानके तरतुदीनुसार ३ महिन्यात वीज जोडणी देणे आवश्यक होते, ती दिली नाही. दि. ३१.३.२०११ च्या अगोदर चलन भरलेले एकूण ६७ लोकांचे लाईन ओढून कनेक्शन देणे बाकी आहे. तसेच दि. ३१.३.२०११ नंतर चलन भरुन प्रलंबित यादी एकूण ४३४ ची आहे. श्री. भोसले यांना जेष्ठता यादीनुसार वीज पुरवठा करणेत येईल असे म्हटले आहे. परंतु कृती मानके तरतुदीनुसार मुदतीत वीज जोडणी न दिल्यास अर्जदार ग्राहकास विलंबापोटी नुकसान भरपाई देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे. जेष्ठतायादीत क्रमांक बराच खालचा आहे, प्रलंबित यादी मोठी आहे म्हणून कृती मानके तरतुदीची पूर्तता करण्यात वि.प.कडून कुचराई झाली, अपयश आले असे मंचाचे मत आहे. जेष्ठतायादीमुळे वि.प. वीज पुरवठा करण्याची आपली कायदेशीर जबाबदारी टाळू शकत नाही. ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील कलम ८.२ नुसार मंच ग्राहकाचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश देऊ शकते. प्रस्तुत केसमध्ये ग्राहकाने चलन भरुन चाचणी अहवाल दिला आहे. त्यांस वीज पुरवठा मिळणे जरुरी आहे. कृती मानकानुसार ३ महिन्याची मुदत नोव्हेंबर २०११ मध्ये संपल्यानंतर आजतागायत ५ महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊनही वीज पुरवठा दिला नाही. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. ३०.५.२०१२ पर्यंत ग्राहकास वीज जोडणी देण्याचे मंचासमोर मान्य केले आहे. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश-

## **आदेश**

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी जत उप विभाग यांनी मंचासमोर कबूल केल्याप्रमाणे ग्राहकास दि. ३०.५.२०१२ पर्यंत त्यांची शेत जमीन गट क्र. ६८७/१ येथे शेती पंपास वीज जोडणी द्यावी व त्याचा पूर्तता अहवाल मंचास द्यावा.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com